पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समाज व धर्म सुधारणा विषयक कार्य

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या, विधी व सामाजिक सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास या विषयावरील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवी करीता सादर करावयाचा

संशोधन प्रबंधाचा आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधक

गजानन किसन जुमडे

(एम.ए. बी.एड्. सेट- इतिहास व सेट-राज्यशास्त्र)

मो.9403223298, 9422381738

Email-jumadegajanan111@gmail.com

(अनुसुचित जाती)

मार्गदर्शक

प्रो. डॉ. बंडे शारदा गोविंदराव

इतिहास विभाग प्रमुख

स्वातंत्र्यसैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पुर्णा

ता. पुर्णा जि. परभणी

मो.9404975546, 9850630480

Email-dr.sharadabande17400@gmail.com

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर

ता. बिलोली जि. नांदेड

(RRC मार्च 2022)

पेरियार ई.व्ही. रामास्वामी यांचे समाज व धर्म सुधारणा विषयक कार्ये

1) प्रस्तावना :

प्राचीन भारताच्याय इतिहासातून आपल्याला अनेक बाबींची माहिती मिळते. हडप्पा संस्कृती किंवा सिंधु संस्कृती पासून आधुनिक भारतीय संस्कृती किंवा पर्यंतचा मानवी उत्क्रांतीचा इतिहास अभ्यासल्यास असे दिसून येते की, मानवी समाज हा अनेक स्थित्यंतरातून गेलेला दिसून येतो. या स्थित्यंतरासोबतच मानवी समाजाचे सुध्दा स्थित्यंतर झाले.

अश्मयुगात मानवाने शेती व पशुपालन करण्यास सुरुवात केली. यातून मानवाला नवनवीन गोष्टींची माहिती झाली. मानवी गरजांमधुन विविध शोध लागले. यामधून जाणारा मानवी समाज नंतरच्या काळात समुहाने राहू लागला. या समुहाच्या अनेक आकक्रमणकारी टोळयांनी भारतावर आक्रमणे केली. या आक्रमणातून मूलनिवासी समुदायाला हरवून जेते वर्गाने या देशात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र अशी कामावार आधारित वर्ण विभागणी केली. नंतरच्या काळात याच वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था निर्माण झाली. ही जाती व्यवस्था भेदभावावर आधारित असल्याने माणसामाणसात उच्च-निच, श्रेष्ठ-कनिष्ठ, सवर्ण-शुद्र असा भेदभाव निर्माण झाला.

प्राचीन धर्मग्रंथानी, वेदउपनिषदांनी हा भेदभाव मान्य करून माणसामाणसांची एकप्रकारे फाळणी केली. यातून अस्पृश्य व स्त्रीयांवर अनेक कठोर बंधने टाण्यात आले या बंधनातून मानवी समाजाची मुक्तता समाजाची मुक्तता करण्यासाठी अनेक महापूरूषेनी महत्त्वपूर्ण कार्य केले.

शाक्यमुनी तथागत गौतम बुध्द, महात्मा जोतिराम फुले, रार्षी छत्रपती शाहू महाराज, महर्षी धोंडों केशव कर्वे, गोपाळ आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजाराम मोहन रॉय अशा असंख्य महापुरुषांनी समाजातील अनष्ठि रूढी, प्रथा, परंपरा चालीरीती, उच्च-निय भेदभाव, अस्पृश्यता, बालविवाह, सतीप्रथा, विधवा पुनर्विवाह,

बालहत्या, केशवपन अशा अनगिनत वाईटांचा बिमोड करून समाज एकसंघ व समतामूलक करण्याचा आजन्म प्रयत्न केला.

दक्षिण भारत हा द्रविड संस्कृती मानणारा प्राचीन समाज मानला जातो. याच द्रविड संस्कृतीने दक्षिण भारताचे रक्षण करून परकीय आर्य आक्रमकांना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. परंतु इसवी सनाच्या दहाव्या-अकराव्या शतकापासून दक्षिणेत सुध्दा वर्णाश्रम मधर्माने शिरकाव करून जातीव्यवस्था व भेदाभेद निर्माण करून शुद्र व स्त्रीयांना मुलभूत हक्क आणि अधिकारांपासून वंचित ठेवले.

समाजातील अशा शोषित, वंचित, कामगार, शेतमजूर, अस्पृश स्त्रीयांच्या अधिकारासाठी एकोणिसाव्या शेतकात एका महापुरुषाचा जन्म झाला. ज्याने समाजातील अस्पृशता, शोषण, अंधश्रध्दा, पाखंडवाद जातीवाद यातून मावी समाजाला बाहेर काढून एका समता मूलक समाजाच्या, वैज्ञानिक विचारांचा अंगिकार करून व्यवस्थेविरुध्द बंड केले आणि समाजाला नवीन दिशा दाखविली ते महान व्यक्ती म्हणजे पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर हे होत.

पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर हे विज्ञान बोध आणि तर्क विषयाचे क्रांतिकारी विचारक मानले जातात. त्यांनीच दक्षिण भारतातील समाजातील अस्पृश्य, पिडीत, शोषित, वंचित व्यक्तींना सन्मानाने जगण्याचा व समान अधिकार मिळविण्याचा मार्ग दाखविला. दक्षिण भारतातील राजकारणातून ब्राह्मणवादाला सुरुंग लावून समतामूलक समाजव्यवस्था बळकट करण्याचे महान कार्य केले.

तत्कालीन मद्रास प्रांतात “ जस्टीस पार्टी ” ची स्थापना केली. 1944 मध्ये याच पार्टीचे नामरण “द्रविड कळघम”असे केले. यातूनच पुढे “द्रविड मुन्नेत्र कळघम ” अर्थत “द्रमुक” (DMK) या पक्षाचा उदय झाला.

ब्रिटिश भारतात 1937 च्या निवडणूकीत सी राजगोपालचारी मद्रास पेसिडेन्सीचे मुख्यमंत्री बनले. तेव्हा त्यांनी सर्व शाळांमध्ये हिंदी भाषेचे शिक्षण अनवार्य केले. या विरुध्द

पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी आंदोलन केले. 1938 मध्ये त्यांना अटक करण्यात आली. अनेक महिला लहान मुलांसह 1200 पेक्षा अधिक लोक तुरुंगात गेले. यामध्ये थलममुथु आणि नटराजन यांचा मृत्यू झाल्याने जनआक्रोश प्रचंड वाढला.

सन 1919 मध्ये सी राजगोपालाचारी यांच्या पुढाकाराने पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सभासद झाले. 1920 च्या महात्मा गांधीजींच्या “असहकार चळवळी ” मध्ये त्यांनी भाग घेतला. त्यांना अटक करण्यात आली. 1922 मध्ये ते मद्रास प्रसिडेन्सी काँग्रेससमितीचे अध्यक्ष बनले. त्यांनी सरकारी नौकरी व शिक्षण क्षेत्रात आरक्षणाचा प्रस्ताव मांडला तो तत्कालीन काँग्रेस नेतृत्वाने नाकारला. म्हण्न त्यांनी 1925 मध्ये काँग्रेस सोडली.

1924 मध्ये केरळमध्ये गावणाकोर राजाने दलितांना मंदिरात प्रवेशबंदी केली होती. त्या विरोधात आंदोलन उभे राहिले. आंदोलनाच्या नेत्तयांना राजाने तुरुंगात टाकले. त्योवेळी आंदोलकांनी पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांना नेतृत्व करण्याची विनंती केली. वायकोम सत्यागृहात सहभागी होण्यासाठी त्यांनी मद्रास काँग्रसचे अध्यक्षपद सोडले.

बालविवाहाची प्रथा मोडीत निघावी, विधवा महिलांना पुनर्विवाह करता यावा, साथीदार निवडण्याची आणि साथीदाराला सोडण्याची मुभा असावी, लग्न म्हणजे पवित्र बंधन नाही तर सहजीवन असाव यासाठी त्यांनी सातत्त्याने प्रयत्न केले. महिलांनी मुलांना जन्म देण्याच ओझं झुगारून देऊन शिक्षण घ्याव, लग्न झालेल्या महिलांना मंगळसुत्र परिधान करण्याची सक्ती नसावी. महिलांच्या हक्कासाठी आयोजित परिषदेत त्यांना पेरियार (महान) ही पदवी देण्यात आली.

समाजातील अंधश्रध्दा आणि भेदभाव यांचं मुळ वैदिक हिंदू धर्मात आहे. असे त्यांचे मत होते. वैदिक धर्मात समाजाची रचना एखादया उतरंडीसारखी असून ब्राह्मण सर्वात अव्वल स्थानी आहेत.

दक्षिणेकडील राज्य स्वतंत्र भारतातील सामील होण्याला त्यांचा विरोध होता. दक्षिण भारत मिळून स्वतंत्र “द्रविड नाडू ” अर्थात “ द्रविड राष्ट्र ” असावे असे त्यांचे मत होते. अनेक सभेत त्यांनी आपले विचार मांडले. “ मी बोलतोय, म्हणतोय म्हणुन मान्य करु नका. सारासार विचार करा. तुमच्या मनाला पटलं तरच तस वागा अन्यथा सोडून दया.” असे त्यांचे उद्गार प्रसिध्द आहेत.

विवेकवाद, सर्वसमावेशकता, स्वसम्मान, धर्म आणि देवाच्या अस्तित्वाला विरोध, जात आणि पितृसत्ताक पध्दतीचे निर्मूलन या सर्व गोष्टींचा वारसा पेरियार ई.व्ही. रामस्वामी नायकर यांनी दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार ई.व्ही. रामस्वामी नायकर यांचे विचार एकमेकांशी सुसंगत असेच होते. पेरियारन अभ्यासक लेखिका व्हि. गीता म्हणतात. “ पेरियार यांचा चार गोष्टटींना विरोध होता. ते नेहमी म्हणायचे, जर तुम्हाला माझ तत्वज्ञान समजून घ्याचे असेल तर, मी ब्राह्मणांना विरोध का करतो, कारण ते स्वत:ला इतर सगळयांपेक्षा श्रेष्ठ मानतात, मी श्रीमंताच्या सामर्थ्यांचा विरोध करतो, कारण ते भ्रष्टाचार करू शकतात आणि सगळयांच्या नशिबाचा फैसला करू शकतात. मला सुशिक्षीत लोकांबद्दल साशंकता वाटते कारण ते नेहमी न्यायाच्या बाजूने उभे राहतात असे नाही आणि मी सर्व धर्माच्या विरोधात आहे, कारण धर्म तुम्हाला विचार करण्यापासून रोखतो.”

पेरियार ई.व्ही रामास्वामी नायकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौध्द धर्म स्वीकारण्याच्या निर्णयाच स्वागत केल होत. हिंदू महिलांना हकक देणा-या हिंदू कोड बिलासाठी त्यांनी पाठिंबा दिला होता.

याबाबत परियार विचारक अरूणमोळी म्हणतात, “ पेरियार जो लढा रस्त्यांवरून, परिषदांमधून लढत होते त्याला राष्ट्रीय स्तरावर कायदेशीर स्वरुपात आणण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर करत होते.”

2)अध्ययन विषयाचे निवड

कोणत्याही संशोधन कार्याला सुरुवात करण्यापूर्वी संशोध्न विषयाची निवडक करणे आवश्यक असते.

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये अनेक महनीय आणि थोर व्यक्तींना भारतीय समाजास दिशा दाखविण्याचे महान कार्य केले आहे. या काया्रची माहिती येणा-या पिढीला देणे मागील पिढीचे कर्तव्ये असते. दक्षिण भारतातील शोषित, वंचित, अस्पृश्य यांच्या उध्दाराचे कार्य करणारे महान व्यक्ती पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या कार्याची माहिती उततश्र भारतीय भाषीकांना सुध्दा होणे आवश्यक आहे. कोणताही महापुरुष हा केवळ एका जातीचा, धर्माचा, प्रांताचा, प्रदेशाचा नसून तो समस्त मानवजातीचा आणि राष्ट्रांचा वारसा असतो.

दक्षिण भारतातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी बिरूदावली भूषविणा-या पेरियार ई.व्ही रामास्वामी नायकर यांच्या समाज व धर्मसुधारणा विषयक कार्याची माहिती मराठी भाषिक सर्वसामान्य जणांना वहावी या उदात्त उद्देशाने हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे. या अगोदर राज्यशास्त्र विषयाच्या अंतर्गत- पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या कार्य आणि कर्तृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास हा विषय संशोधक दिपक मधुकर भालेराव यांनी संशोधन केलेले आढळून आले आहे. परंतु, समाज व धर्मसुधारणा विषयक कार्याचा आढवा मी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

3)संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा –

इतिहासाचे संशोधन, अभ्यास, लेखन ही अविरत चालणारी प्रक्रिया असली तरी इतिहास संशोधनाला काही मर्यादा आहेत. भूतकाळात घडून गेलेलया प्रत्येक घटनेची नोंद घेऊन तिचे ज्ञान करून देणे संशोधकाला शक्य नसते. संशोधनकर्ता सर्वकालीन नियम मांडू शकत नाही. इतिहास संशोधनात विज्ञानातील प्रयोग आणि निरीक्षण यांचा वापर करून घटनांची मांडणी करता येणे शक्य नसते.

दक्षिण भारतीय समाज व धर्मसुधारणा यामध्ये अनेक महनिय व्यक्तींनी परिवर्तन घडवून आण्याचा प्रयत्न केला आहे. पेरियात ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे जीवन कार्ये खूप मोठे आहे. म्हणुन संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा ठरविणे अतिशय आवश्यक ठरते. अन्यथा संशोधन कार्य इतरत्र भरकटण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन मी माझ्या संशोधन विषयाला , " पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समान व धर्म सुधारणा विषयक कार्य." असे मर्यादित केले आहे. प्रकरणानुसार आवश्यक तेथे इतर बाबींचा उल्लेख करण्यात येईल.

4)संशोधन आराखडा

कोणतेही संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधन आराखडयाची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे संशोधन प्रक्रिया सुलभ बनते. संशोधकाचा वेळ, श्रम, पैसा वाचतो. संशोधनात एकसुत्रीपणा येतो.

" पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समाज व धर्म सुधारणा विषय कार्ये." या विषयाचे वर्णन असल्याचे वर्णनात्मक संशोधन आराखडा तयार करण्यात येईल.

5) संशोधन पध्दती

" पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समाज व धर्म सुधारणा विषयक कार्ये " या विषयाचे सखोल संशोधन केले जाणार असून त्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. ऐतिहासिक संशोधन पध्दतीत प्रामुख्याने ज्या घटना घडून गेलेल्या आहेत त्या घटनांचा सखोल अभ्यास करुन संशोधन करण्यासाठी या पध्दतीचा वापर केला जातो. मिळालेल्या सर्व माहितीची चिकित्सा करून विश्वसनियतेच्या आधारावर तठस्थ राहून माहितीचे संकलन करून निष्कर्ष काढले जातात.

6) संशोधन विषयाची साधने :

“ पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समाज व धर्म सुधारणा विषयक कार्ये ” या विषयावर आधारित संशोधन करण्यासाठी संशोधकाने 1) विविध स्थळांना भेटी 2) मुलाखत 3) प्रकाशित मराठी, हिंदी , इंग्रजी साहित्य 4) त्यांची स्वत:ची पुस्तके व इतरांची भाषणे 5) सरकारी कागदपत्रे 6) त्यांच्या जीवनावर केलेले प्रबंध 7) तत्कालीन वृत्तपत्रे 8) पत्रव्यवहार 9) विशेषांक 10) मासिके 11) नियतकालिके 12) आठवणी 13) शासकीय प्रकाशनअशा अनेक संदर्भ साहित्याचा वापर केला जाईल. ही सर्व साधनसामग्री ककाटेकोरपणे तपासून संशोधनाचे निष्कर्ष काढले जातील त्यासाठी गुणात्मक आणि परिणामात्मक अशा दोन्ही प्रकारची साधन सामग्री वापरली जाईल.

7) संशोधन विषयाची उद्दिटये :-

“ पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समाज व धर्म सुधारणा विषयक कार्ये ” हा संशोधन विषय निश्चित केल्यानंतर संशोधन कार्याचे उद्दिष्टे निश्चित करणे क्रमप्राप्त ठरते. यातूनच संशोधनास दिशा प्राप्त होते. संशोधन विषयाच्या उद्दिष्टांशिवाय संशोधन कार्य केले जाऊ शकत नाही. या संशोधन विषयाची उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

1) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे.
2) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या समाज सुधारणा विषयक कार्याचा आढावा घेणे.
3) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या धर्मसुधारणा विषयक आंदोलनाचा आढावा घेणे.
4) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या विविध आंदोलनाचा मागोवा घेणे.
5) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या कार्याचा समाजावर झालेला परिणाम याचा अभ्यास करणे.
6) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या आंदोलनातून निर्माण झालेल्या नवमूल्यांचा व नवसंकल्पनाचा मागोवा घेणे.
7) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्यावर प्रभाव पाडणाऱ्या विविध घटनांचा अभ्यास करणे.

8) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या विचारावर आधारित नवीन पिढीच्या विचारांचा मागोवा घेणे.

9) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या विचावर मार्गक्रमण करणाऱ्या समाजाविषयी जाणून घेणे.

10) देशाच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीतील पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या कार्याचा पडलेला प्रभाव आणि त्याची फलनिष्पत्ती जाणून घेणे.

8) संशोधन विषयाची गृहितके :-

1) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या काळातील भारतीय समाज अंधश्रध्दा आणि पाखंडवादाने ग्रासलेला होता.

2) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी समाज व धर्म सुधारणा करण्यासाठी आजन्म परिश्रम केले.

3) समाजातील शोषित, वंचित, अस्पृश्य यांना समाजाच्या समाता मूलक प्रवाहात आण्ण्यासाठी वैज्ञानिक विचारांची कास धरली पाहिजे असे समाज मनावर बिंबवले.

4) आंदोजनाच्या माध्यमातून समाज जागृती करता येते हे पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी दाखवून दिले.

5) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी समाज संघटित करून समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा , परंपरा यांना विरोध करून सशक्त आणि समतावादी समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

6) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी धार्मिक दहशतवाद झुगारून बुध्दिवादी व तर्कवादी दृष्टीकोन अंगिकारून समाज परिवर्तन घडवून आणले.

7) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी समाज सुधारणा व धर्म सुधारणेसाठी अविरत प्रयत्न केले.

8) भारतीय राष्ट्रीय सभेचे एक सदस्य म्हणून पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी असहकार आंदोलनाचे नेतृत्व केले.

9) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या कार्यामुळे दक्षिण भारतात मोठी सामाजिक क्रांती घडून आली.

10) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांच्या क्रांतीकारी विचारातून अनेक सकारात्मक बदल समाजात घडून आले.

9) प्रकरण नियोजन :-

" पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समाज व धर्म सुधारणा विषयक कार्ये " या संशोधन विषयाचे प्रकरण नियोजन पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

प्रकरण पहिले

पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचा संघर्षमस जीवनप्रवास

या प्रकरणात पेरियार रामास्वामी यांचे बालपण, बालपणीचे कट्टर धार्मिकता , वयाच्या 15 व्या वर्षी काशीला जाणे, काशीवरून परत घरी येणे, शिक्षाण याबाबतीत अीयास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे इंडियन नॅशनल काँग्रेस मधील कार्य

या प्रकरणात पेरियार रामास्वामी यांनी चक्रवर्ती राजागोपालाचारी यांच्या पुढाकारातून इंडियन नॅशनल काँग्रेस मध्ये सक्रीय सहभाग घेतला. मद्रास काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य, असहकार आंदोलनात घेतलेला सहभाग या सर्व बाबींचा आढावा याय प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा यांच्या विरोधातील आंदोलने आणि कार्ये

या प्रकरणात पेरियार रामास्वामी यांनी हिंदू धर्मातील वाईट रुढी, प्रथा, परंपरांचा विरोध करून प्रत्यक्ष ढोल बडवून आंदोलने केली. ब्राह्मणांनी कशा प्रकारे चलाखी करून वर्णव्यवस्था निर्माण केली, देवी-देवतांची निर्मिती केली. समाजात शोषित, वंचित, अस्पृश्य वर्गाच्या शोषणाची व्यवस्था कशा प्रकारे काम करत होती. या सर्व बाबींचा आढावा प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचा वायकोम सत्याग्रह

या प्रकरणात केरळ मधील वायकोम सत्याग्रह, सत्याग्रहाची पूर्वपिठीका, प्रत्यक्ष सत्याग्रहातील घटना, सत्याग्रहाचा परिणाम, सत्याग्रहातील सत्याग्रही या सर्व बाबींचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचं भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान

या प्रकरणात ब्रिटिश भारतातील स्वातंत्र्य संग्राम, विविध सत्याग्रह, आंदोलन यांच्याशी पेरियार रामास्वामी यांचा असणारा सहभाग व सहसंबंध या समग्र बाबींचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण साहवे

पेरियार ई.व्ही. रामास्वामी यांचे स्वातंत्र्योत्तर भारतातील कार्य

या प्रकरणात भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पेरियार रामास्वामी यांचे भारतीय संघराज्य संबधीचे विचार, भारतीय संविधान विषयक विचार व कार्य, भारत व पाकिस्तान फाळणी, भारत व चीन युध्दे, भारत व पाकिस्तान युध्दासंदर्भाने पेरियार यांच्या विचारांचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे

उपसंहार- निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात वरील सहा प्रकरणांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन समकालीन साहित्य, कागदपत्रे, संशोधक, विद्वान, इतिहासकारांची मते अशा सर्व समग्र बाबींचा आढावा घेऊन उचित साधनांच्या आधारे “ पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर यांचे समाज व धर्म सुधारणा विषयक कार्ये ” या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात येईल. आणि वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाईल.

10) संदर्भ ग्रंथ सुची

1) प्रा. डॉ विमलकिर्ती, क्रांतीकारी बुध्दिजीवी सुमाजसुधारक पेरियार ई.व्ही. रामास्वामी
2) अजयकुमार, पेरियार रामास्वामी : जीवन और दर्शन्
3) एस.एस. गौतम, पेरियार ने कहा
4) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर : व्यक्तित्व, विचार एवं सामाजिक क्रांती
5) बहूजन समाज प्रकाशन, पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकर
6) सम्यक प्रकाशन, पेरियार : सचित्र जीवनी
7) पेरियार ई.व्ही. रामास्वामी नायकेर : सच्ची रामायण
8) यादव ललई सिंह, सच्ची रामायाण और सच्ची रामायण की चाभी
9) प्रमोद रंजन, संपादक, धर्म और विश्वदृष्टी, पेरियार ई.व्ही. रामास्वामी
10) वी.गीता, संपादक, ई.व्ही. रामास्वामी पेरियिार, दर्शन- चिंतन, और सच्ची रामायण
11) Mehta, Vrajendra Raj, Tahomas Pantham, 2006, Political Ideas in Modern India
12) Arora, N.D. , S.S. Awasthy. 2007, Political Theory and political thought
13) Thakurta, Paranjoy Guha, Shankar Raghuraman, 2004, A time of coalitions: Divided we stand. Sage publications New Delhi
14) Thanthhai Periyar, why were women enstaved
15) Periyarr E.V. Ramaswami, words of freedom ideas of nation
16) Prof. Rr. Perumal, Periyar a comparative study
17) De. Veeramani, Periyar Fominisim
18) Madras, Emerala publishers, 1994, Religion and society
19) Kindle, Periyar : A political Biography of E.V. Ramaswami, 2012
20) Shankar Rao, C.N. Sociology of Indian society New Delhi, 2004
21) Pillai K.K., The caste system in Tamil Nadu, Chennai, 2007
22) Hanumanth K.R. , Untocchability, Madurai, 1979
23) Karan singh, Religions of India, New Delhi, 1983
24) Anita Deihl, Periyar E.V. Ramaswami, Madras, 1978
25) Robert L. Hardgrave, The Dravidian Movement Bombay, Popular Prakashan, 1965